<u>नि.फौ.ख.क्र.१२९/२०२२</u>
शासन–वि–योगेश पवार
**नि.क्र.२६.**

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.२ यांची जबानी</u>**

मी याद्वारे सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की,

| | | |
|---|---|---|
| नाव | – | संजय हिरालाल लगड, |
| वय | – | ३७ वर्षे, |
| व्यवसाय | – | पोलीस कॉन्स्टेबल ब.क. २९४२, |
| राहणार | – | सासवड पोलीस स्टेशन, जि. पुणे. |

**<u>सरतपासणी अभियोग पक्षातर्फे विद्वान सहा. सरकारी अभियोक्ता श्री. एस. पी. आंधळे यांच्यामार्फत शपथेवर सुरुः–</u>**

१. २०२१ साली पीआय साहेबांनी फोन करुन सांगितले की, त्यांना संशयरित्या वाळूची वाहतूक होत असल्याची बातमी मिळाली आहे. त्यामुळे आम्ही पुणे सोलापूर हायवेवर भांडगाव गावाच्या हद्दीत भांडगाव फाट्याजवळ शिवनेरी मिसळ हॉटेलसमोर सकाळी ६ च्या दरम्यान गेलो. त्यावेळी एक ट्रक येताना दिसला. संशय आल्याने सदरचा ट्रक अडवून चेक केले असता त्याच्या हौदमध्ये अंदाजे तीन ब्रास वाळू मिळून आली. त्या ट्रकचा नंबर. एम. एच. १२ के. पी. २०२२ अशी होती. सदरचा ट्रक योगेश पवार चालवित होता. त्याला पाहिल्यास ओळखू शकतो. आरोपी आज न्यायालयात हजर नाही. त्याची ओळख विनाआव्हानित करण्याच्या अटीवर गैरहजेरी माफ करण्यात आली. त्यानंतर सदरचा ट्रक पोलीस स्टेशनला घेऊन गेलो आणि आरोपीविरुध्द गुन्हा नोंदविण्यात आला.

**<u>सरतपास पुर्ण.</u>**

**<u>सदर साक्षीदाराचा उलटतपास आरोपीतर्फे विद्वान विधीज्ञ श्री. व्ही. ए. माने यांच्यामार्फतः–</u>**

२. कारवाई करिता जाण्यापूर्वी मी स्टेशन डायरीला नोंद केली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, कारवाईला उपस्थित असलेले दुसरे सहका–यांची ड्युटीची वेळ काय होती हे मी आज सांगू शकत नाही. कारवाई केल्यानंतर सदरची ट्रक कोठून भरुन आणली याबाबत आरोपीकडे चौकशी केली नव्हती. सदर गुन्ह्यामध्ये तहसिल खात्याला कळविले नव्हते आणि वाळू मोजमाप करण्याकरिता तेथून कोणाला बोलाविले नव्हते. वादातील ट्रक हा नामदेव पवार याच्याकडून नोटरी करुन आरोपीने खरेदी करुन घेतला होता. ट्रकमधील वाळू तीन ब्रास असल्याचे अंदाजे सांगत आहे, त्याची मोजमाप

कोणत्याही साधनाने केली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीला स्वतः वाळू उपसा करीत असताना आम्ही पाहिलेले नव्हतो. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळाच्या चतुःसीमा खात्रीशीररित्या सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, कोणताही वाळूचा ट्रक जप्त करण्यात आला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, वरिष्ठांच्या सांगण्यावरुन खोटी कारवाई केली होता. हे म्हणणे खरे नाही की, खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत. समक्ष

Sd/-

दिनांकः- ११.११.२०२५ **[ श्रीमती एस. ए. विराणी ]**
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, दौंड, जि. पुणे.